महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

शनिवार ❖ १४ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६९ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

### बेस्ट अपघात धडा कोण घेणार?

✍ रविंद्र घोडविंदे

अपुरं प्रशिक्षण आणि जुन्या बसवर चालकाच्या सततच्या वापरामुळे बस अपघात वाढत आहेत. कुर्ल्यात बस अपघात प्रकरण हा तसाच प्रकार असावा, गत सोमवारी म्हणजेच ९ डिसेंबरला कुर्ला पश्चिमेत बेस्ट बसनं अनेक वाहनांना धडक दिली, पादचाऱ्यांना चिरडलं. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला. तर ४२ जण जखमी झालेत. या अपघातातील बस चालकाची चौकशी सुरु आहे. त्याला अटक केली आहे.

पोलीस आणि बेस्ट प्रशासन आपल्या कामात व्यस्त झाले, घटनेने व्यथित झालेले मुंबईकरही पूर्वपदावर आलेत, मात्र या घटनेमुळे बेस्ट बसमधील सुरक्षित प्रवासाची हमी काय? हा सवाल अनुत्तरितच आहे. सध्या शासकीय दळण वळण सुविधेत राज्य परिवहन व महापालिका परिवह सेवा याच सुविधा सध्या कार्यरत आहेत. त्यातही मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाचे पीक फोफावले आहे.

बेस्ट उपक्रमात २०१९ पासून भाडेतत्त्वावरील बसच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मात्र, या भाडेतत्त्वावरील बसबाबत प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सतत तक्रारी आहेत. गेल्या तीन वर्षांत 'बेस्ट'च्या स्वमालकीच्या आणि भाडेतत्त्वावरील बसचे २४७ हुन अधिक अपघात झालेत . यात भाडेतत्त्वावरील बसचे प्रमाण सर्वाधिक आहे; आणि हाच चिंतेचा विषय आहे.

दरम्यान, भाडे तत्वावरील बसगाडयांमुळे झालेल्या अपघातात २०२२ मध्ये १३ जण दगावले तर , ८ जण गंभीर व १ जण किरकोळ जखमी झालेला आहे. २०२३ मध्ये ७ जणांचा मृत्यू तर ४ जण गंभीर जखमी व २ जण किरकोळ जखमी झालेत. सन २०२४ मध्ये विविध अपघातात २७ जणांचे बळी गेले आहेत. ६२ जण गंभीर तर ८२ जण किरकोळ जखमी झाले आहेत. एकंदरीत भाडे तत्वावरील बसगाड्यांच्या अपघातात गेल्या ३ वर्षात एकूण ४७ जणांचे बळी गेले आहेत. तसेच, ६२ जण गंभीर तर ५४ जण किरकोळ जखमी झाले आहेत.

अपघातांची ही मालिका आजही सुरूच आहे. बेस्टच्या स्वमालकीच्या बसचा अपघात झाल्यास त्या अपघाताची जबाबदारी बेस्ट उपक्रम घेत असते तर, कंत्राटी बसचा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर असते. हे जरी खरे असले तरी लाख दोन लाखाची शासकीय मदत देऊन एखाद्याच्या जीवाची भरपाई कधीही करता येणार नाही.

मुळात हे अपघात का होतात यावर प्रशासनाने चिंतन करणे जसे गरजेचे आहे. तसेच कायम स्वरूपी उपाय योजनावर चिंतन होणे आवशक आहे. खाजगिकरणातून चालविल्या जाणाऱ्या बसगाड्या अपघातात अग्रक्रमांकावर आहेत. असे आकडे सांगतात. वाढत्या खाजगीकरणामुळे बेस्टच्या स्वमालकीच्या ताफ्यात दररोज घट होत आहे आणि हीच परिस्थिती राहिल्यास २०२७ पर्यंत स्वतःच्या मालकीच्या बसेसची संख्या शून्य होईल. असे म्हटले तर चूकीचे ठरणार नाही.

नवीन बसेस नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्येही स्तब्धता आहे. कर्मचाऱ्यांना कोणतेही विशेष लाभ नाहीत, पदोन्नती नाहीत, रिक्त पदे भरली जात नाहीत, कंत्राटदार नियमांचे पालन करत नाहीत आणि कामगारांना योग्य प्रशिक्षण दिले जात नाही. बसेसची देखभाल मानकांनुसार केली जात नाही, त्यामुळे बेस्ट बस प्रवास असुरक्षित आणि मुंबईकरांसाठी जीवघेणा ठरू लागला आहे.

काही महापालिका कालबाह्य झालेल्या आणि मोडकळीस आलेल्या गाड्या सेवेत वापरुन प्रवाशांच्या जीवाशी खेळत आहेत? कुर्ल्यात झालेल्या आपघातातून टीएमटी, केडीएमटी, एनएमएमटी, एमबीएमटी या महत्त्वकांक्षी उपक्रमांनी बोध घेतला पाहिजे. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था असल्याने प्रत्येक महापालाकिकेने आपल्या ताफ्यातील बसगाड्यांची देखभाल दुरुस्ती त्वरित करून कालबाह्य झालेल्या बसगाड्या सेवेतून बाद करणे, आता काळाची गरज आहे. चालक आणि वाहकांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना गरजेनुसार प्रशिक्षण देणे शिवाय त्यांना आवश्यक त्या अद्ययावत सुविधा पुरविणे, त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे या बाबींचा प्रत्येक परिवहन उपक्रमाकडून प्राधान्याने विचार व्हावा हीच अपेक्षा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित


सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2024-25

११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY



Look forward to a BRIGHTER FUTURE

7719814142
9130580111

## मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त ठरला!

# शपथविधी सोहळा नागपूरात?



### हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला होणार शपथविधी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर राज्य सरकार स्थापन झाल्यानंतर आता मंत्रिमंडळ विस्ताराची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. १६ डिसेंबरपूर्वी आम्ही मंत्रिमंडळ विस्तार करू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच म्हटलं होतं. त्यानुसार महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार शनिवारी होण्याची शक्यता असून राजभवनात शपथविधीच्या तयारीची लगबग सुरू असल्याचे वृत्त आले होते. मात्र, आता थेट नागपूरलाच महायुती सरकाच्या मंत्र्यांचा शपथविधी होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. १६ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदारांची सोय पान ४ वर ▶▶

**शिवसेनेचे संभाव्य कॅबिनेट मंत्री**
एकनाथ शिंदे
उदय सामंत
शंभुराज देसाई
दादा भुसे
प्रताप सरनाईक
संजय शिरसाट
गुलाबराव पाटील
भरत गोगावले

**शिवसेनेचे संभाव्य राज्यमंत्री**
योगेश कदम
विजय शिवतारे
राजेंद्र यड्रावकर
प्रकाश आबिटकर

## मला पदमुक्त करा !

### – नाना पटोलेंचं दिल्लीला पत्र

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**



मुंबई : लोकसभा निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीला महाराष्ट्रात मोठं यश मिळालं होतं. त्यामध्ये, १३ जागांसह काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला होता. मात्र, विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेससह महाविकास आघाडीचं पानीपत झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, या पराभवाची जबाबदारी स्वीकारत नाना पटोले यांनी पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदावरून मला मुक्त करा, अशा आशयाचं पत्र नाना पटोले यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना दिलं आहे. मला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदावर चार वर्ष पूर्ण झाली असून आता प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करावी, तसेच नवी कमिटी स्थापन करा, मला पदावरून मुक्त करा असे पत्रच नाना पटोलेंकडून मल्लिकार्जुन खर्गे यांना देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यामुळे नाना पटोले यांनी ही भूमिका घेतल्याचे समजते.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ १७ जागांवर यश मिळालं आहे. तर, महाविकास आघाडीला ४९ जागांवर विजय मिळाला. मात्र, भाजप महायुतीला तब्बल २३७ जागांवर विजय मिळाला असून भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे, राज्यातील पराभवाची जबाबदारी स्वीकारत नाना पटोले यांनी आपल्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊ केल्याचं समजतं. त्याच अनुषंगाने त्यांनी मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून जबाबदारीतून मुक्त करावे, गेल्या ४ वर्षांपासून मी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष असल्याचंही त्यांनी म्हटलंय. राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल २३ नोव्हेंबर पान ४ वर ▶▶



## पुढील स्थानक 'चिखलोली'

### स्थानकाच्या उभारणीला वेग

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**☐ प्रतिनिधी**

**अंबरनाथ :** गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या अंबरनाथ आणि बदलापूर रेल्वे स्थानकादरम्यान होणाऱ्या चिखलोली स्थानक निर्मितीच्या कामाने वेग घेतला आहे, रेल्वे स्थानकाचा उभारणीसाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनकडून दोन प्रकारच्या निविदा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे लवकरच रेल्वेमध्ये 'पुढील स्थानक चिखलोली' अशी घोषणा ऐकायला मिळेल.

चिखलोली येथे होणाऱ्या रेल्वे स्थानकासाठी ओव्हर हेड उपकरणे उभारून कार्यान्वित करणे तसेच स्थानकाची उभारणी अशा दोन निविदा आहेत. दोन निविदा जाहीर झाल्या असल्या तरी गेल्या काही महिन्यांपासून स्थानकाच्या प्रत्यक्ष जागेवर विविध प्रकारची कामे सुरू आहेत.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून राज्य सरकारच्या भागिदारीत या स्थानकाची उभारणी केली जाते आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ अ च्या माध्यमातून कल्याण आणि बदलापूर स्थानकादरम्यान १४ किलोमीटर लांबीची १५१० कोटी रूपयांच्या खर्चातून तिसरी चौथी मार्गिका टाकण्याचे काम हाती घेतले आहे. त्याचबरोबर चिखलोली स्थानकाचे काम देखील सुरू आहे. नव्या स्थानक परिसरात ओव्हरहेड उपकरणे उभारणे, त्यांचे आरेखन, तपासणी आणि कार्यान्वित करण्याच्या कामाची निविदा मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून जाहीर करण्यात आली आहे. यासोबतच चिखलोली रेल्वे स्थानकाच्या प्रत्यक्ष बांधकामाचीही निविदा जाहीर केली आहे. ११ कोटी ४८ लाख २ हजार ७५९ रूपयांची आणि २१ कोटी ६४ लाख ३२ हजार ९७४ रूपयांची दुसरी अशा दोन निविदांचा याच समावेश आहे.

चिखलोली रेल्वे स्थानकाची उभारणी आणि ओव्हरहेड उपकरणांची कामे पूर्ण झाल्यास रेल्वे स्थानक कार्यान्वीत होणे शक्य होणार आहे. त्यामुळे लवकरच चिखलोली रेल्वे पान ४ वर ▶▶

### जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने 'कुष्ठमुक्त महाराष्ट्र' मोहीमेचा शुभारंभ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**



**ठाणे दि. १३ -** केंद्र शासनाने २०२७ पर्यंत कुष्ठरोग रुग्णांची संख्या शुन्य करण्याचे धोरण आखले आहे. त्याअनुषंगाने आरोग्य विभागाच्यावतीने दि. १६ डिसेंबर, २०२४ ते २० डिसेंबर, २०२४ या कालावधीत ठाणे जिल्हा ग्रामीण व शहरी विभागामध्ये कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) ही मोहीम राबविण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ अखेर ६०१ कुष्ठ रुग्णांची नोंद कुष्ठरोग विभागाने केली आहे. वेदना नसल्याने अनेकवेळा रुग्ण याआजाराकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे याकडे दुर्लक्ष न करता वेळेत निदान करावयाचे आव्हान कुष्ठरोग विभागाकडून करण्यात येत आहे. पान ४ वर ▶▶




### पालिका निवडणुका एप्रिलनंतरच?

### २२ जानेवारीच्या सुनावणीवर भवितव्य

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ विशेष प्रतिनिधी**

मुंबई : विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत विजय मिळाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जोरदार चर्चा सुरू आहे. पण, तूर्तास निवडणुका होण्याची शक्यता नाही. निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर तयारीसाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारी रोजी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. प्रामुख्याने महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य पान ४ वर ▶▶

## दुरुस्तीसाठी निधी मिळेना

# ठाणे मनपाचा तिसरा डोळा बंद !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : दि. १२,** ठाणेकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संपुर्ण शहरभर बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ११२ सीसीटिव्ही कॅमेरे गेल्या काही महिन्यांपासून बंदावस्थेत असून नादुरुस्त झालेल्या कॅमेऱ्यांच्या जागी नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याची बाब पुढे आली आहे. त्यावर पर्याय म्हणून ठाणे महापालिकेने आता बंद कॅमेऱ्यांच्या जागेवर पोलिस योजनेतून बसविण्यात येणारे कॅमेरे बसविण्याचा विचार सुरू केला असून तशा सुचना पालिकेकडून पोलिसांना करण्यात येत आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

> ठाणे शहरातील बंदावस्थेत असलेले सीसीटिव्ही कॅमेरे दुरुस्त करण्यात येतात. परंतु काही कॅमेरे नादुरुस्त झाले आहेत. त्याचबरोबर पोलिसांकडून शहरात कॅमेरे बसविण्यात येत असून पोलिसांकडून त्यासाठी ठिकाणांची विचारणा करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांना बंदावस्थेत असलेल्या कॅमेऱ्यांच्या ठिकाणी नवीन कॅमेरे बसविण्याबाबत कळविण्यात येत आहे.
> **शुभांगी केसवाणी, उपनगर अभियंता (विद्युत), ठाणे महापालिका**

ठाणे, कळवा आणि मुंब्रा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये चित्रित होणारी सर्व माहिती हाजुरी येथील नियंत्रण कक्षात संकलित केली जात असते. या कॅमेऱ्यांमुळे शहरातील अनेक गुन्हे उघडकीस करण्यासाठी पोलिसांना मदत झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी बसविण्यात पान ४ वर ▶▶

# कवी जयंत पाटील यांना 'चिंकोरा'साठी 'आगरी साहित्य पुरस्कार'

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**

आगरी युथ फोरम, डोंबिवली आयोजित २० वा अखिल भारतीय आगरी महोत्सवात सापाड गांव कल्याणचे कवी जयंत पाटील यांना 'चिंकोरा' साठी राज्यस्तरीय 'आगरी साहित्य पुरस्कार' २०२४ या वर्षासाठी मोठया उत्साहात प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार डॉ. श्रीपाद जोशी (मा. अध्यक्षः अ.भा. मराठी साहित्य महामंडळ) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सोबत डॉ. लक्ष्मीकांत देशमुख (मा. अध्यक्षः ९१वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन), प्रा. मिलिंद जोशी (कार्याध्यक्षः महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे), सुरेश देशपांडे (कार्याध्यक्षः म. सा. प. पुणे डोंबिवली शाखा) आगरी युथ फोरम चे गुलाब वझे, विश्वनाथ रसाळ, रामकृष्ण पाटील, कवी. संदेश भोईर, कवी. नितुराज पाटील, दिपेश भोईर, राजेंद्र पाटील उपस्थित होते.



भव्य सन्मान चिन्ह, सन्मान पत्र व १० हजार रोख असे ह्या पुरस्काराचे स्वरुप होते.

पारितोषिक मिळालेल्या 'चिंकोरा', या काव्य संग्रहास ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य, डॉ. सदानंद पाटील यांनी प्रस्तावना दिली आहे. या संग्रहाचे मुखपृष्ठ नंदेश गावंड यांनी आपल्या कलाकृतीतून अतिशय सुंदर साकारले आहे. कवी जयंत पाटीलांनी या काव्य संग्रहातून, आगरी बोलीच्या माध्यमातून समाज मनाला अनेकानेक चिमटे काढले आहेत. ई- बूक स्वरुपात हे पुस्तक ऑनलाईन वाचण्यास उपलब्ध आहे.

# क.डों.म.पा शिक्षण विभागाच्या गैरकारभाराविरुद्ध सिपीआयचे आमरण उपोषण सुरु



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण डोंबिवली महानगर पालिका अंतर्गत शिक्षण विभागात युवराज महाले यांना चुकीच्या पद्धतीने पदोन्नती देत मुख्याध्यापक पदी नियुक्ती करण्यात आलेली असून बीडीओ यांनी दिलेला गोपनीय अहवाल देखील रद्द करण्यात आला होता. परंतु महापालिका आयुक्त यांनी यावर निर्णय देणे अपेक्षित असताना अद्याप महापालिका आयुक्त यांनी कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. याच्या निषेधार्थ सिपीआयच्या वतीने रमेश गायकवाड हे कल्याण पाश्चिमेतील सुभाष मैदान येथे आमरण उपोषणाला बसले आहेत.

केडीएमसी शिक्षण विभागातील मुख्याध्यापक पदोन्नती २०२१ ची मूळ नस्ती गेली दोन वर्ष सादर न करणाऱ्या व संबंधित नस्ती गहाल करणाऱ्या अधिकारी विजय सरकटे व सा.प्र. वरिष्ठ लिपिक शशिकांत महाले यांच्यावर फौजदारी गुन्हाची नोंद करून त्यांना ताबडतोब बडतर्फ करावे. शाळा क्र. २१ आयरे या शाळेतील जावक मध्ये खाडाखोड करून जावक क्रमांक मध्ये फेरफार करणाऱ्या तत्कालीन मुख्याध्यापक मोरेश्वर धानवे व संबंधित शिक्षक युवराज महाले यांच्यावर फौजदारी गुन्हाची नोंद करून ताबडतोब बडतर्फ करावे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका पदोन्नती २०२१ ची निवड समितीची अंतिम बैठक २१ डिसेंबर २०२१ ला झाली. या बैठकीत सर्व पात्र कर्मचाऱ्यांची कागदपत्रे गोपनीय अहवाल यांची पडताळणी झाली आहे. परंतु महाले यांचे गोपनीय अहवाल हे पंचायत समिती कल्याण शिक्षण विभागाकडून ३१ डिसेंबर २०२१ ला दिले गेले आहेत असे कळविण्यात आले. हि बाब संशयास्पद आहे. निवड समिती ची मीटिंग होऊन. १० दिवसानंतर गोपनीय अहवाल कोणाच्या मदतीने ठेवण्यात आले.

याची चौकशी करून गुन्हा नोंद करण्यात यावे व संबंधित कर्मचाऱ्यास बडतर्फ करण्यात यावे. या मागण्या उपोषण कर्त्यांनी केल्या आहेत.

हे तीन मुद्दे विचारात घेता युवराज महाले यांना देण्यात आलेली मुख्याध्यापक पदाची पदोन्नती रद्द करण्यात यावी तसेच युवराज महाले यांनी गैरप्रकारे कागदपत्र सादर करून शासकीय दफ्तरी फेरफार केल्याबद्दल त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याची मागणी उपोषणकर्ते रमेश गायकवाड यांनी केली आहे.

## महाराष्ट्र शासनाकडून जिल्हा परिषद पालघर अंतर्गत
# चार रुग्णवाहिकांचे लोकार्पण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(ऋषीकेश जाधव)**

पालघर/ महाराष्ट्र शासन उपसंचालक, परिवहन यांचेकडून आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत प्रा.आ.केंद्र नवघर ता. वसई, प्रा.आ.केंद्र चंद्रनगर ता. डहाणू, प्रा.आ. केंद्र उधवा,प्रा.आ.केंद्र सुत्रकार ता.तलासरी अशा चार रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या असून आज दिनांक १३ /१२/२० रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हा परिषद उपाध्यक्ष पंकज कोरे, पालघर यांच्या हस्ते तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे,समाज कल्याण समिती सभापती मनीषा निमकर, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे, बांधकाम आरोग्य समिती सभापती संदेश ढोणे, महिला व बालकल्याण समिती सभापती रोहिणी शेलार, तसेच जिल्हा परिषद सदस्य,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद पालघर यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.



यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, जि. प.सदस्य मंगेश भोईर,हबीब शेख,अनिल झिरवा यांनी स्वतः रुग्णवाहिका चालवून शुभारंभ केला.

या रुग्णवाहिका हि आपली स्वतःची मालमत्ता आहे असे समजून वाहनाची काळजी घ्या.तुमच्या हातून रुग्णांची सेवा होत असून त्यासाठी रुग्णवाहिका देखील सुस्थितीत असणे गरजेचे आहे,त्यामुळे तिची काळजी घेणे हे तुमचे कर्तव्य आहे असे जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी चालकांना सांगितले.यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## कल्याण पूर्वेतील विकास कामांकरिता
# आ. सुलभा गायकवाड यांनी घेतली आयुक्तांची भेट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

नवनिर्वाचित आमदार माननीय आमदार सौ. सुलभाताई गणपत गायकवाड यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त माननीय इंदुराणी जाखड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कल्याण पूर्वेतील लोकोपयोगी विविध विकास कामे तसेच काही शासन दरबारी प्रलंबित असलेल्या कामांबाबत सविस्तर चर्चा करून ही विकासकामे तातडीने मार्गी लाऊन सामान्यजनतेला लवकरात लवकर योग्य न्याय मिळावा आणि त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यात याव्या असे निवेदन देण्यात आले. माननीय आयुक्त इंदुराणी जाखड यांच्याकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद देत यावर लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

**या निवेदन पत्रातील काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे :-**

कल्याण पुर्वेतील तिसगाव नाका ते काटेमानिवली नाका या यु टाईप २४ मीटर (८०फूट) रस्त्याच्या बायोमेट्रीक सर्व्हेची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी तसेच कल्याण पुर्वेतील तिसगाव नाका ते काटेमानिवली नाका या यु टाईप २४ मीटर (८०फूट) रस्त्याच्या काम जलद गतीने होण्यासाठी प्रयत्न करावे व नागरिकांचे पुर्नवसन करावे.

कल्याण पूर्व येथील १०० फुटी रोड लगत रुग्णालया करिता (आरक्षण क्र. २८३) आरक्षित असलेली ३०,००० चौ.मी. जागा अधिग्रहण करण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करून या ठिकाणी अद्ययावत रुग्णालय उभारण्याकरिता लागणारा निधीसाठीचा प्रस्ताव तातडीने राज्यशासनाकडे सादर करण्याबाबत.

कल्याण पूर्वेतील मराठा कोळशेवाडी येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रिडांगण येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य शिवस्मारक होणे बाबत...

कल्याण पूर्वेतील कर्मवीर दादासाहेब गायकवाड क्रिडांगण व त्या समोरील राजर्षी शाहू उद्यान हे एकत्र करून युटाईप रस्ता रुंदीकरण करतांना गणपती मंदिर चौक मराठा कोळशेवाडी ते सिद्धार्थनगर स्काय वॉक समांतर रस्ता तयार करणे बाबत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर व पाणी बिलाची थकबाकी असणाऱ्या करदात्यावर आकारण्यात येणारे दंड/ व्याज १००ℨ माफ करण्यासाठी अभय योजना सुरु करणे बाबत...

कल्याण पूर्व येथील १०० फुटी रोड लगत क्रीडासंकुल आरक्षण क्र. २७९ आरक्षित जागेचे अधिग्रहण करण्याची प्रक्रिया नगररचना विभागाच्या दिरंगाईमुळे अद्याप पूर्ण झालेली नसल्याने सदरची जमीन अधिग्रहण प्रक्रिया तातडीने सुरु करणे तसेच क्रीडासंकुल उभारण्याकरिता लागणारा निधीसाठीचा डी.पी.आर. त्वरित राज्य शासनाकडे सादर करणेबाबत...

कल्याण पुर्वेतील विशेषतः चिंचपाडा, आशेळे, माणेरे, द्वारली, नांदिवली व वसार परिसरामधील पाणी समस्या तसेच अमृत योजने अंतर्गत पाण्याची पाईपलाईन टाकणे व जल कुंभ बनविण्याच्याचे संथ गतीने सुरु असल्याबाबत.

चिंचपाडा, आशेळे, माणेरे, द्वारली, नांदिवली व वसार या नव्याने समाविष्ठ झालेल्या ग्रामीण भागात पथदिवे बसविणे.

RDSS योजने अंतर्गत प्रस्तावित उपकेंद्र महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीला २२/११ के.व्ही. उपकेंद्रासाठी ३००० चौ.मी. जागा उपलब्ध करून देणे.

कल्याण पूर्वेतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता प्रभाग क्र.१०० तिसगाव गावठाण, सर्व्हे नं.८६ आरक्षण क्र.४४३ येथे जलकुंभ तातडीने बनविणे.

नवी मुंबई महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्याधर्तीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामधील ५०० चौरसफुटापर्यतच्या घरांवरील मालमत्ता कर माफ करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविण्याबाबत.

गेल्या पाच वर्षांपासून (R&B) आर अँड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. या ठेकेदारा मार्फत कल्याण पूर्वेतील '४-जे' प्रभाग क्षेत्र अंतर्गत घनकचरा विभागात कार्यरत ५० स्वच्छता कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समावून घेण्याबाबत.

कल्याण पुर्वेतील विशेषतः चिंचपाडा, आशेळे, माणेरे, द्वारली, नांदिवली व वसार परिसरामधील पाणी समस्या तातडीने सोडवण्यासाठी योग्य त्या उपयायोजना करण्याबाबत तसेच पाणी समस्या संपुष्टात येईपर्यत दररोज टॅकरद्वारे मोफत पाणी पुरवठा करण्याबाबत...

# आर्य गुरुकुलचा भव्य क्रिडा दिन साजरा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**

आर्य गुरुकुल, कल्याणने १३ डिसेंबर रोजी त्यांच्या शाळेच्या मैदानावर त्यांचा बहुप्रतीक्षित वार्षिक क्रीडा दिन-खेळ मेळा मोठ्या उत्साहात आणि उर्जेने आयोजित केला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा १००% सक्रिय सहभाग दिसला. पारंपरिक शपथविधी, शालेय ध्वजारोहण, एनसीसी कॅडेट्सचा मार्चपास्ट आणि मशाल प्रज्वलित करून, ऑलिम्पिक उद्घाटन कार्यक्रमाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

गार्ड ऑफ ऑनर आणि ध्वज फडकावल्याने उपस्थित सर्वांमध्ये खिलाडूवृत्तीची भावना प्रज्वलित झाली. प्रमुख पाहुणे, लेफ्टनंट कमांडर डॉ. हरीश कुमार दुबे, व्हीपी ॲडमिन आणि सहाय्यक. बी.के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण, प्राध्यापक (भौतिकशास्त्र) यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन समारंभपूर्वक मशाल पेटवून केले आणि बालपणात शारीरिक तंदुरुस्ती आणि सांघिक कार्याचे महत्त्व याविषयी प्रेरणादायी शब्दात उपस्थितांना संबोधित केले.

या वर्षीच्या खेळ मेळ्याची थीम होती युनिव्हर्सल आउटलुक - ऑलिम्पिक मुलांना चिन्मय व्हिजन कार्यक्रमाच्या स्तंभाच्या जवळ आणणे. हे मूल्य मुलांना जागतिक नागरिक होण्यासाठी प्रेरित करते आणि जागतिक परिस्थितीत ते स्वतःला मोठे योगदान देणारे म्हणून पाहतात. या कार्यक्रमाला उपस्थित पाहुणे अश्विन सरवना कुमार, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतरणपटू आणि श्री अनिरुद्ध महाडिक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतरण प्रशिक्षक होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित असलेल्या तरुण यशवंतांचा सत्कार करण्यात आला. रुतुजा सरवंगार, नॅशनल स्केटिंग चॅम्पियन आणि श्रुती शुक्ला, डिव्हिजन चॅम्पियन स्पीक टाकराव आणि टेनिसकोइट ज्यांनी अनेक व्यासपीठांवर त्यांच्या खेळाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी खेळ खेळताना प्रेरित कसे राहावे, खेळाडू भावना कशी विकसित करावी आणि नियमित प्रशिक्षणाचे महत्त्व याविषयी त्यांचे विचार मांडले.

युनिव्हर्सल आउटलुकच्या थीमभोवती फिरत असताना खेळ मेळा २०२४ मध्ये विद्यार्थ्यांना विविध खेळ आणि ॲथलेटिक शर्यतींमध्ये सहभागी होता आले. हा निकाल म्हणजे जिद्द आणि खिलाडूवृत्तीचा शानदार देखावा होता.

भरत मलिक, आर्य ग्लोबलचे अध्यक्ष म्हणाले, 'खेळ ही मुलाच्या आरोग्यासाठी केलेली गुंतवणूक आहे.' खेळ मेळ्यासाठी शाळेने केलेल्या काटेकोर व्यवस्थेचेही त्यांनी कौतुक केले. उपस्थित सर्वांनी पालकांना त्यांच्या मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

दीपक वर्मा, आर्य गुरुकुलचे क्रीडा संचालक यांनी सांगितले की आर्य गुरुकुल अनेक व्यवस्था करत आहे जेणेकरून विद्यार्थ्यांना आता शाळेच्या वेळेतच नवीन खेळ शिकता येतील आणि हा नवीन उपक्रम लवकरच सुरू केला जाईल. त्यांनी पालकांना आवाहन केले की त्यांनी प्रत्येक मुलाला किमान एक खेळ घेण्यास प्रोत्साहित करावे कारण यामुळे मुलाचा सर्वांगीण विकास होतो.

राधामणी अय्यार, मुख्याध्यापिका यांनी सांगितले की भारत हा आज जास्तीत जास्त तरुण लोकसंख्येचा देश आहे आणि खेळ खेळल्याने मन तीक्ष्ण राहते, शरीर तंदुरुस्त राहते आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास चालना मिळते.

दिवसाची सांगता एका उत्साही पदक वितरण समारंभाने झाली, जिथे सर्व सहभागींना त्यांच्या प्रयत्नांसाठी मान्यता मिळाली. पालक आणि शिक्षकांनी यश संपादन केलेल्या तरुणांचा जयजयकार केल्याने वातावरण अभिमानाने आणि आनंदाने भरले होते.

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले.

गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले.

भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला.या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही.

लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले.त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला.

१९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले.

गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!


दैनिक जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातींना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

- E Mail -

jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com





१४ डिसेंबर २०२४
शनिवार

**मेष**
तुमच्या कौटुंबिक जीवनात सुसंवाद वाढेल. आज तुम्हाला काही मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. आज तुम्हाला आर्थिक लाभाची संधी मिळेल.

**वृषभ**
अडथळ्यांनी भरलेली कामे पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात परस्पर समन्वय वाढेल. तुमचे कुटुंबीय काही कामासाठी तुमची प्रशंसा करतील.

**मिथुन**
तुमची आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल. मित्रांसोबत सहलीचा आनंद घ्याल. तुम्हाला तुमच्या मुलांकडून चांगली बातमी मिळू शकते.

**कर्क**
तुम्हाला नातेवाईकाला दिलेले पैसे परत मिळतील. त्यांचा नियोजित कामात उपयोग होईल. मीडिया क्षेत्राशी संबंधित लोकांना आज चांगला फायदा होईल.

**सिंह**
फॅशन डिझायनर्ससाठी आजचा दिवस चांगला राहील.वैवाहिक जीवनात मधुरता वाढेल. कौटुंबिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक अनुकूल होईल.

**कन्या**
पूर्वीपासून सुरू असलेला कौटुंबिक कलह आज संपुष्टात येईल. तुमचा दिवस आनंदाने भरलेला असेल. कल्पनेवर चर्चा कराल.

**तूळ**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थोडी मेहनत करावी लागेल, यश मिळण्याची शक्यता आहे. मोठा बदल होईल.लोकांमध्ये समन्वय राखाल.

**वृश्चिक**
तुमच्या उत्पन्नाच्या तुलनेत तुमचे खर्च वाढतील. आज काही नवीन कामात तुमची रुची वाढेल. विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील.

**धनु**
नोकरीसाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांना लवकरच चांगली बातमी मिळेल.अचानक आर्थिक लाभामुळे तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

**मकर**
विद्यार्थ्यांना मेहनतीचे चांगले फळ मिळेल. वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. धार्मिक विधीत सहभागी होण्याची संधी मिळू शकते.

**कुंभ**
कामात तुमचे प्रयत्न यशस्वी होतील, तुमचे मन प्रसन्न राहील. जे अविवाहित आहेत त्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनासाठी चांगले संबंध मिळतील.

**मीन**
विशेष पाहुण्यांचे स्वागत करण्यात तुम्ही व्यस्त असाल आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. उत्पन्नाचे नवीन स्रोत देखील मिळतील.

# पेण खारेपाटात दुबार भातशेतीचा ‘श्रीगणेशा’

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी) :** खारेपाट क्षेत्रात पावसाच्या पाण्यावरच भातशेती होत असते. पावसाळयानंतर पाण्याचे मोठे दुर्भिक्ष्य या क्षेत्रात असल्याने येथे दुबार भातशेती इच्छा असूनही शेतकऱ्यांना करता येत नाही. परंतू पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील बहिरामकोटक गावातील तरुण प्रयोगशील शेतकरी दयानंद म्हात्रे यांनी आपल्या शेतातील तलावाच्या पाण्यावर दुबार भात शेतीचा प्रयोग यशस्वी केला असून, रायगडच नव्हे तर संपूर्ण कोकणातील खारेपाटातील शेतकऱ्यांपुढे एक आदर्श वस्तूपाठ ठेवला आहे.

भात हे उष्ण कटिबंधातील पीक असून त्यास उष्ण व दमट हवामानाची गरज असते. पीक वाढीच्या कालावधीतील सरासरी तापमान २४ ते ३२ अंश सेल्सियस पोषक असते. चांगले उत्पादन येण्यास हवेतील सरासरी आद्रर्ता ६५ टक्के लागते. या पिकास सरासरी १००० मिमीपेक्षा जास्त पावसाची आवश्यकता असते. पुरेसा पाऊस व सिंचनाची सोय उपलब्ध झाल्यास हे पीक सर्व प्रकारच्या जमिनीत घेतले जाते. परंतु, पाणी उपलब्ध नाही, अशा क्षेत्रात तलावाच्या माध्यमातून पाणी उपलब्ध करुन घेवून पेण तालुक्यातील बहीरामकोटक येथील दयानंद म्हात्रे या तरुण प्रयोगशील शेतकऱ्यांने उन्हाळी भात शेती प्रथमच यशस्वी करुन येथील शेतकऱ्यांना बेरोजगारीवर मात कशी करायची, हे दाखवून दिले आहे. दयानंद यांनी यावर्षी प्रथमच दुबार भातशेती केली आहे.

खरिप अर्थात पावसाळी शेतीपेक्षा उन्हाळी शेती बऱ्यापैकी सोपी आहे. आणि चांगले पिक देणारी असल्याचे दयानंद यांनी म्हटले आहे. बेभरवशाच्या पावसावर शेती करणे आताच्या काळात खूप कठीण आहे. कारण, निसर्गाच्या अनियमित बदलामुळे जून, जुलै महिन्यात पाऊस पडला तर खूप, नाही तर शेतातील पिके करपून जातात तर कधी पावसाचा पत्ता नसतो. त्यामुळे उन्हाळी शेती फायद्याची ठरते.खारेपाटातील जमिन चिकट असून पाणी शेतात टिकून राहते. याचा फायदा घेत उन्हाळी शेती करण्याचे ठरवून ती योग्यरित्या पिकवून चांगल्याप्रकारे रोप तयार झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

# दत्त संप्रदाय



सज्जनांचे संरक्षण, दुर्जन यांचे निर्दालन,सत धर्माचे पालन व आचरण हे भगवद अवताराचे मुख्य प्रयोजन असल्याने अज्ञानाने, दुःखाने ग्रासलेल्या मानवाचा यथार्थ ज्ञानाच्या योगाने उद्धार करण्याकरिता भगवंताने दत्तावतार धारण केला !! श्री.दत्तावतार म्हणजे साक्षात् परब्रह्मामुर्ती श्री सतगुरुंचा अवतार ! उत्पत्ती स्थिती लय घडविण्याचे अनादी अनंत शाश्वत गुरुतत्वाचे प्रकटीकरण याची प्रत्यक्ष अनुभूती म्हणजे श्री दत्तात्रेय !!!

तेराव्या शतकापासून त्रिमूर्ती श्री दत्तात्रेयांची उपासना प्रारंभ झाली.आपल्या सर्वच ग्रंथामध्ये दत्ताचे स्वरूप मधे ईश्वर व गुरू या दोहोंची उपासना भक्तांना ,साधकांना घडत असते. त्यामुळे गुरुतत्वाचा अंतिम आदर्श ’श्रीगुरू देव दत्त’ हा जयघोष आहे.श्री दत्तात्रेय यांचा मुख्य भर आत्मशिक्षणा वर,अन् अवतार चिरंतन शाश्वत आहे.भक्तांवर अनुकंपा व कृपा करणारे आहे.भक्ताची आर्त हाक ऐकून केवळ स्मरण केल्याने कृपा करण्यास धावून येतात म्हणून त्यांना स्मरतृगामी असे म्हणतात.त्यांचा निवास oudumbr वृक्ष तळी असून श्रीगुरुचरित्र ग्रंथ दत्त संप्रदाय यांचे प्रमाण ग्रंथ आहे.श्रीदत्तात्रेय यांचे अवतार कार्य युगानुयुगे अव्याहत सुरू असून,त्यांची उपासना विशेष फलदायी आहे. सर्वच सत्संग केंद्रात गुरुचरित्र पारायण, आरती,पालखी सोहळा, दत्तजयंती उत्सव मोठया उत्साहात भक्तीभावाने साजरा केला जातो.

महाराष्ट्रात दत्तभक्तीचा प्रचार अन् प्रसार हा धर्मातीत आहे.सर्व संप्रदाय मधे प्रगाढ श्रद्धा असून सर्व धर्मीय साधक यांची ती उपास्य देवता आहे.दत्तात्रेयांचा अवतार चातुर्वर्ण्य संवर्धनासाठी झालेला असून ते एक योगी असल्याने योगविद्येला प्राधान्य प्राप्त झाले.दत्त उपासना केल्याने साधक भक्तांना सिद्धी प्राप्त होवून ते आपली दुःखे दूर करू शकतात अशी भावना,समज सर्व सामान्य माणसाच्या मनामधे रुजत गेला.मनोकामनाची पूर्ती होताना दिसून आले.श्री दत्तगुरु संस्थेला प्राधान्य देणाऱ्या सर्व संप्रदायामध्ये दत्तात्रेयांची पुज्यता रूढार्थाने सबळ झाली. दत्त संप्रदाय हा सगुण असून या संप्रदाय ची मुळे पूर्ण भारतभर पसरली आहेत.यास बराचसा अगम्य व रहस्यमय समजले जाते.दत्त उपासना चां प्रसार मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आहे.

सर्व संप्रदाय मधे दत्त देवता बाबत उत्कट श्रद्धा भाव असून त्याचा प्रभाव सर्वत्र आहे. शैव,शाक्त,अन् वैष्णव या उपासक प्रवाहाला व्यापणारा आहे.जीवनाला आवश्यक असणारे मंत्र शास्त्राचे संवर्धन करण्याचे कार्य हे दत्त संप्रदायाने केले आहे. नरसोबाची वाडी, गाणगापूर, अवदुंबर ही प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत.श्री दत्त संचारी आहेत,नित्य भ्रमण मधे ते दुःखीता ना ,पीडितांना,संरक्षण देत संकट मुक्त करतात. आत्म क्षेत्रात,व्यापक अन् समन्वय असलेला दृष्टीकोन हा अवताराचे विशेष महत्त्वाचे प्रतिक आहे.दत्त जयंती चे दिनी केलेली साधना ताकद वान व प्रभावी असते, जेव्हड्या एकाग्रतेने करू तेव्हढीच साधकाला फलदायी प्राप्त होते.त्रिगुणात्मक चिरंतन शक्ती सर्व व्यापक असून ती आपण साधनेने रुजवली पाहिजे.हे खरोखर आपल्या मनामध्ये , चित्ता मधे बिंबवले पाहिजे.तर आपण हा भव सागर पार करत नौका किनाऱ्यावर नेवू शकतो. अवधूत चिंतन गुरुदेव श्री गुरुदेव दत्त या मंत्र मधे अद्वितीय दैवी शक्ती ची अनुभूती घेवू शकतो.असे मला उपासना अंती जाणवते.

**- सौ.मीना घोडविंदे,ठाणे**

# भाजपा परिवाराचे सदस्यत्व म्हणजे देशसेवेची सुवर्णसंधी
## – माजी आमदार नरेंद्र पवार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** ’सेवा ही संघटन’ या तत्त्वावर वाटचाल करणाऱ्या भारतीय जनता पक्ष परिवाराचे सदस्यत्व म्हणजे देशासेवा करण्याची सुवर्णसंधी असल्याचे मत भाजपचे माजी आमदार आणि सदस्य नोंदणी मोहिमेचे प्रदेश सहसंयोजक नरेंद्र पवार यांनी व्यक्त केल.

नोंदणी मोहिमेअंतर्गत शहापूर, मुरबाड आणि बदलापूरमध्ये नरेंद्र पवार, आमदार किसन कथोरे यांच्यासह स्थानिक नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठका संपन्न झाल्या. त्यामध्ये पवार यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना हे मत व्यक्त केले. आजच्या घडीला भारतीय जनता पक्ष हा सर्वाधिक सदस्य असलेला भारतातील नव्हे तर जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष म्हणून उदयास आला आहे. केंद्र सरकारकडून सुरू असलेली गतिमान विकासकामे आणि भविष्याचा वेध घेत दूरगामी परिणाम करणाऱ्या ध्येय धोरणांची आखणीच नव्हे तर अंमलबजावणीही सुरू आहे. या सर्व गोष्टींनी प्रेरित होऊन आज देशभरात अनेकजण भारतीय जनता पक्षाचे सदस्य होण्यासाठी स्वतःहून पुढे येत आहेत. तर ’राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः’ या मूलभूत विचारधारेवर भाजपची सुरुवातीपासून वाटचाल सुरु असून कोट्यावधी कार्यकर्ते हीच आपल्या भाजपा परिवाराची खरी ताकद असल्याचेही नरेंद्र पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.तसेच शहापूर, मुरबाड आणि बदलापूरमध्येही आपण सर्वांनी अधिकाधिक संख्येने भाजपमध्ये नव्या सदस्याची नोंदणी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

भारतीय जनता पक्षाच्या शहापूर तालुका, शहापूर शहर मंडळ, मुरबाड ग्रामीण, मुरबाड शहर मंडळांची ही सदस्यता नोंदणी अभियान बैठका संपन्न झाल्या.

## भिवंडी तालुक्यातील कशेळी ते दिवे अंजुर खाडीमध्ये
# अवैध रेतीउपसा करणाऱ्यांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ भिवंडी(प्रतिनिधी) :** भिवंडी तालुक्यातील कशेळी ते दिवे अंजूर दरम्यानच्या खाडीपात्रामध्ये अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर भिवंडी अपर मंडळाधिकारी व तलाठी कार्यालयाने कारवाई करून २ सक्शन पंप बाहेर काढून नष्ट करण्यात आले व १ बार्जला कटरच्या सहाय्याने बुडविण्यात आले. यावेळी जप्त मालमत्तेतील २ सक्शन पंपची किंमत १० लाख व १ बार्ज किंमत ८ लाख अशी एकूण १८ लाख किंमतीची मालमत्ता नष्ट करण्यात आली असून याप्रकरणी नारपोली पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे तसेच भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या आदेशावरून व भिवंडी तहसिलदार अभिजित खोले यांच्या सूचनेनुसार मौजे कशेळी ते दिवे अंजुर या खाडीमध्ये अप्पर मंडळधिकारी भिवंडी, मंडळ अधिकारी खारबाव व मंडळातील अधिनस्त तलाठी खारबाव, कोन, अंजुर व काल्हेर ग्राम महसूल अधिकारी यांच्या पथकाने या खाडीमध्ये अनधिकृतरित्या रेती उपसा करणाऱ्या सक्शन पंप व बार्ज वर आज सकाळी ८ वाजता कार्यवाही केली. यामध्ये भिवंडी तालुक्यातील मौजे आलिमघर येथील खाडीपात्रामध्ये १ बार्ज व २ सक्शन पंप आढळून आले. पथकाची चाहूल लागताच तेथील सक्शन वरील व्यक्ती पसार झाले.

जप्त केलेली मालमत्ता मौजे काल्हेर येथील बंदराच्या किनाऱ्याजवळ आणून २ सक्शन पंप बाहेर काढून नष्ट करण्यात आले व १ बार्जला कटरच्या सहाय्याने छीद्र पाडून मध्यभागी नेवून बुडविण्यात आले.

# कंत्राटदाराकडील थकबाकीपोटी केडीएमसीने दिलीप कपोते वाहनतळ घेतले ताब्यात







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली महा पालिकेचे, कल्याण (प.) रेल्वे स्थानकाजवळील कै.दिलीप कपोते बहुमजली बांधीव वाहनतळ या धर्तीवर ३ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर चालविणेकामी मे. कुमार इन्टरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस यांना १६ फेब्रुवारी २०२४ पासुन, प्रथम ३ महीन्यांचे भाडे रूपये ९४ लाख ५ हजार ५८४ भरून चालविण्याकरीता देण्यात आले होते.

तथापी दि.१६ मे २४ ते १५ नोव्हेंबर,२४ पर्यंत संबधित कंत्राटदाराने भाडे रक्कम (जीएसटी सह) रु. १ कोटी ८८ लाख ११ हजार १६८ इतकी थकवली होती. याबाबत मे.कुमार इंटरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस यांनी करारनाम्यातील अट क्रमांक ६ व ८ चा भंग केल्याने त्यांना वेळावेळी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. तरी देखील मे.कुमार एंटरप्रायझेस आणि श्री गुरुदत्त एंटरप्रायझेस (जॉईंट व्हेन्चर) यांनी थकीत रक्कमेचा भरणा महापालिका फंडात केला नसल्याने, कंत्राटदाराचा करारनामा संपुष्टात आणण्याचा आदेश बजाविण्यात आला आहे. गुरुवारी सायंकाळी, आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे व मालमत्ता विभागाचे उप आयुक्त रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ १ उप आयुक्त प्रसाद बोरकर, सुरक्षा विभागाचे उपायुक्त अवधूत तावडे, यांचे उपस्थितीत मालमत्ता विभागाच्या सहा. आयुक्त सविता हिले, नियंत्रण अधिकारी, प्रसाद ठाकूर, अधिक्षक, जयराम शिंदे, प्रशांत धिवर व मालमत्ता विभागाचा कर्मचारीवर्ग वाहनतळाचा ताबा घेण्यासाठी गेले असता, कंत्राटदाराच्या महिला कर्मचा-यांनी वाहनतळ रिकामे करण्यास विरोध दर्शविला.

या प्रसंगी महापालिका सुरक्षा कर्मचारी व महात्मा फुले पोलिस स्टेशन मधील महिला पोलिस कर्मचारी यांनी त्यांना ताब्यात घेण्याची कारवाई केली. त्यानंतर या जागेवर उपस्थितांच्या समक्ष पंचनामा करुन पोलिस पथकाच्या मदतीने महा पालिका अधिकारी व कर्मचारी यांनी वाहनतळाचा ताबा घेतला आहे.

संबधित कंत्राटादारास महापालिकेने काळया यादीत मध्ये टाकले असुन, त्यांना अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येत असल्याबाबत आदेश विभागाचे उपायुक्त रमेश मिसाळ यांनी निर्गमित केला आहे .

# नागरी संरक्षण दलाचा जनजागृती सप्ताह



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** नागरी संरक्षण दल ६२ वा वर्धापन दिननिमित्त सर्वत्र जनजागृती सप्ताह सुरू आहे. या विषयांन्वये उपनियंत्रक, नागरी संरक्षण, नवीमुंबई समूह ठाणे विजय जाधव यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाने मातोश्री वेलबाई देवजी हरिया कॉलेज, मोहने रोड, शहाड पश्चिम येथे जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमात आणीबाणी उचल पद्धत, बनावटी स्ट्रेचर, प्रथोमोपचार यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच नागरी संरक्षण दलाचे कार्य व महत्व, देशसेवा याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात मातोश्री विद्यालयाचे मुख्यद्यापक गिरीश लटके व शिक्षिका कुमुदिनी सहभागी होते. तसेच नागरी संरक्षण दलाचे शकुंतला राय (कल्याण पश्चिम) आणि रामबरण यादव (टिटवाळा विभाग) हे मानसेवी अधिकारी उपस्थित होते. स्वयंसेवक लिना ढोणे, राजश्री सरोदे, रंजना मुखेडकर, कमल कडलग, स्वाती गिमोणकर, रुपाली कोंडार, योगेश बुडूक, नितीन कापसे, सुहास पवार, कौशल गोळे, निरंत धनके, प्रथमेश ढोणे स्वयंसेवक उपस्थीत होते.

# जलजीवन मिशनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी) :** जल जीवन मिशन कार्यक्रमाचे गावपातळीवर प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावरील पाणी पुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन विषयक गाव पातळीवरील भागधारकांचे प्रशिक्षण दि. १६ डिसेंबर २०२४ ते दि. ९ जानेवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. हिमालय इन्स्टिट्युट फॉर इन्व्हार्यनमेंट इकोलॉजी अॅण्ड डेव्हलपमेंट, संस्था डेहराडून, उत्तराखंड यांच्यामार्फत १ हजार ९७० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रशिक्षण तांत्रिकदृष्या उत्तम नियोजन करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन केले आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील पाणी पुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरूस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन यासाठी भागधारकांचा सहभाग, तसेच गावपातळीवर पाणी विषयक समस्या वेळेत सोडवण्याच्या उद्देशाने जल जीवन मिशन विभागामार्फत प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात येत आहे.

ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष, समितीचे सचिव, पाणीपुरवठा कर्मचारी/ जल सुरक्षक, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे (VWSC) किंवा नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्ती साठी निवड केली असल्यास त्या संस्थेचे जसे स्वयंसहाय्यता महिला बचत गट/ प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (Primary Agricultural Co-opretive Socities-PACS) व निवडलेल्या अन्य संस्थेतील सदस्य, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे (VWSC)महिला सदस्य किंवा नळ पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निवड केली असल्यास त्या संस्थेचे जसे स्वयंसहाय्यता महिला बचत गट / प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (Primary Agricultural Co-opretive Socities-PACS) व निवडलेल्या अन्य संस्थेतील महिला सदस्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग या प्रशिक्षणात असणार आहे.

या प्रशिक्षणासाठी मुरबाड - ४४५ प्रशिक्षणार्थी, शहापुर -५५० प्रशिक्षणार्थी, भिवंडी - ६०५ प्रशिक्षणार्थी, कल्याण -२३० प्रशिक्षणार्थी, अंबरनाथ - १४० प्रशिक्षणार्थी असे जिल्ह्यातील एकूण १ हजार ९७० प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण होणार असल्याबाबतची माहिती प्रकल्प संचालक(जलजीवन मिशन) प्रमोद काळे यांनी दिली आहे.

## मुरबाड नगरपंचायत तर्फे
# प्लास्टिक वापरास प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(बाळासाहेब भालेराव) :** प्लास्टिक पर्यावरणास खूप हानिकारक आहे तसेच प्लास्टिक विघटन होण्यास खूप वेळ लागतो. म्हणून मुरबाड नगरपंचायत एकल प्लास्टिक वापरास प्रतिबंध घालण्याकरिता वेळोवेळी विविध जनजागृती कार्यक्रम राबवत आहे.

तरीदेखील नागरिक दुकानदार



### ३६ किलो प्लास्टिक जप्त करून दंड आकारण्यात आला

फेरीवाले प्लास्टिक वापरताना आढळून येतात. यासगळयावर चाप बसावा याकरिता मुरबाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी प्लास्टिक वापरकर्त्यांवर कठोर कारवाई करण्याकरिता एक विशेष पथक तयार केले आहे.या पथकाद्वारे गेले दोन दिवस शहरात दंडात्मक कारवाई चालू असून ३६ किलो प्लास्टिक जप्त करून दंड आकारण्यत आला आहे. तरी मुरबाड नगरपंचायत द्वारे सर्वांना आवाहन करण्यात येते की प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी पिशवीचा वापर करावा असे आवाहन मुरबाड नगरपंचायतीतर्फे करण्यात आले आहे.

# प्लॅनेट जीएचपी मध्ये किल्लूयांचे भव्य प्रदर्शन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** प्लॅनेट जीएचपीच्या कै. गजानन हिरु पाटील विद्यामंदिर, मातोश्री शेवंताबाई गजानन पाटील माध्यमिक विद्यालय कै. गजानन हिरु पाटील इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज यांच्या प्रांगणामध्ये ऐतिहासिक वारसा लाभलेल्या किल्ल्यांचे भव्य दिव्य असे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

महाराष्ट्राची स्वतंत्रभूमी तयार होण्याआधी शौर्याचा एक मोठा इतिहास या किल्ल्यांनी पाहिलेला आहे. त्याकाळी संरक्षणासाठी महत्त्व असलेले



किल्ले आज आपल्या इतिहासाची, आपल्या पूर्वजांच्या शौर्याची सोनेरी पाने म्हणून आपल्याला तितकेच महत्त्वाचे आहेत. हाच इतिहास आपल्या भावी पिढीला प्रेरणा व दुरुस्ती देण्याचे काम करत आहे. त्यासाठी हा किल्ले प्रदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

संस्कृतीचे कौतुक हवे, इतिहासाचे कौतुक हवे, गड-किल्ल्यांचे कौतुक हवे त्यासाठीच शाळेतील विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे किल्ल्यांचे प्रदर्शन मांडलेले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात संस्था सचिव व मुख्याध्यापक गणेश पाटील तसेच प्लॅनेट जीएचपी तील सर्व शिक्षकवृंद यांनी मोठं योगदान दिलं आहे.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्था अध्यक्ष नारायण पाटील, लायन्स क्लब कल्याण उपाध्यक्ष डि के रेलिया, लायन्स क्लब कल्याण खजिनदार सुनील शर्मा, लायन्स क्लब कल्याण सदस्य भानुदास मडके, ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघ सचिव प्रवीण लोंढे, ठाणे जिल्हा शिवछत्रपती शिक्षक संघटना उपाध्यक्ष मगर, मुकेश पाटील, भाऊसाहेब शिंदे, अनिल पाटील, नरेश पाटील, शशिकांत पाटील, विलास रंधवे, हरीश पाटील, हरिश्चन्द्र पाटील इ. मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमच्या शेवटी सचिव व मुख्याध्यापक गणेश पाटील यांच्या हस्ते प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

### राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत

# ठाणे जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रण सप्ताहाचेआयोजन



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**ठाणे दि. १३** - राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम आरोग्य संस्थास्तरावर राबविण्यात येत असून जिल्हयामध्ये आरोग्य विभागामार्फत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांमध्ये सर्व शासकीय आरोग्य संस्था, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे दि. ११ डिसेंबर, २०२४ पासून ते १७ डिसेंबर, २०२४ हा कालावधी 'सिकलसेल नियंत्रण सप्ताह'' म्हणून साजरा करण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या सूचनेनुसार प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांची तपासणी करून लोकांमध्ये या आजार विषयक जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. यावेळी तपासणी सोबत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून समुपदेशन व जनजागृती केली जात आहे. तसेच शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना (वय १२ ते १७) सिकलसेल आजार त्याचे संक्रमण, संभाव्य धोके इत्यादीबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये सिकलसेल आजार आढळून येतो, हा आजार अनुवंशिक असून या आजारावर अद्याप कोणताही कायमस्वरूपी उपचार उपलब्ध नाही. या आजाराने ग्रस्त असलेल्या रोगी व वाहक व्यक्तीवर औषधोपचार करण्यात येत असले तरी या रोगाचा प्रादुर्भाव पुढच्या पिढीमध्ये टाळता यावा यासाठी लोकांमध्ये या विषयी जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे, म्हणून दिनांक ११ ते १७ डिसेंबर हा कालावधी ''सिकलसेल नियंत्रण सप्ताह'' म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सिकलसेल हा आजार आनुवंशिक आजार आहे. सिकलसेल ग्रस्त व्यक्तीला नियमित औषधोपचारांची गरज असते. सिकलसेल वाहक व्यक्ती बाह्यता निरोगी दिसते परंतु असे रुग्ण समाजात रुग्णांची संख्या वाढविण्यास कारणीभूत ठरू शकतात, म्हणून सर्वांनी जागरूक राहून सिकलसेल आजार संदर्भांत काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

> सिकलसेल हा आजार रक्तदोष आजार असून सिकल पेशी रक्तक्षय या नावाने ओळखला जातो. या आजारात लाल रक्त पेशींचा आकार विळ्यांसारखा होत असल्याने पेशींची लवचिकता कमी होते. यामुळे गुंतागुंत निर्माण होते. सिकलसेल पेशी आजारामुळे नेहमीची होणारी गुंतागुंत म्हणजे रक्तक्षय (अनिमिया) या आजारावर वेळीच लग्नापूर्वी तपासणी केली तर पुढच्या पिढीला अनुवंशीकतेने होणाऱ्या या आजारापासून आपण वाचवू शकतो
>
> *- डॉ. गंगाधर परगे जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे*

या आजाराची लक्षणे ही अशक्तपणा, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, सांधे दुखी, सांधे सुजणे, शरीर पिवळसर होणे, असह्य वेदना होणे, लहान बालकांना वारंवार जंतु संसर्ग होणे, चेहरा निस्तेज दिसणे ही आहेत. या आजाराचे निदान शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत केले जाते. सर्व शासकीय आरोग्य संस्थेत सिकलसेलची तपासणी मोफत केली जाते. सिकलसेल वाहक व ग्रस्त रुग्णास मोफत समुपदेशन, औषधोपचार व संदर्भ सेवा उपलब्ध आहेत.



### महाराष्ट्रात रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून

# सातशे अंगणवाडयातून दहा हजार मुलांना शिक्षण -आयुक्त कैलास पगारे!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : लहान मुलांना खेळातून शिक्षण देण्याबरोबरच अंगणवाडी ताईनी त्यांच्या आई होऊन शिक्षण दिले तर या मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होईल, आणि हे काम रिलायन्स फाऊंडेशन च्या माध्यमातून सुरू झाले आहे. महाराष्ट्रात सुमारे७००अंगणवाडीतील १०हजार मुलांना असे शिक्षण देण्याच्या या उपक्रमाचे उद्घाटन आज कल्याण तालुक्यातील रायते येथे झाले असल्याचे एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे यांनी जाहीर केले.

आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, रिलायन्स फांऊंडेशन ने कोकण विभागात ठाणे जिल्ह्यात २४अंगणवाडया बांधण्यात आल्या आहेत, याचे प्राथनीधीक उद्घाटन तालुक्यातील रायते येथे आज झाले, या अंगणवाडीत खेळातून शिक्षण, दिले जाणार आहे. ग्रामीण भागात अंगणवाडयाचा प्रश्न गंभीर आहे, तरीही महापोषण मध्ये ठाणे जिल्हाने चांगले काम केले आहे. कुपोषण कमी झाले आहे, गरोदरपणात अंगणवाडी सेविका काळजी घेत असल्याने कुपोषण कमी होत आहे, पण तरीही पहिल्या एका तासात केवळ६८टक्के च महिला आपल्या बाळाला दुध पाजतात, हे गंभीर असल्याचे सांगून याकडे शासन विशेष लक्ष देत असल्याचे सांगितले.

यानंतर रायते पिंपळोली ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच समिता सुरोशे या म्हणाल्या,आमच्या गावात अंगणवाडी बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती, मात्र माझी झेडपी सदस्यां जयश्री सासे यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे आज या अंगणवाडया उभ्या राहिल्या आहेत. तर अंगणवाडी सेविका सुंनदा पवार यांनी आपले अनुभव उपस्थितीतां समोर मांडले, जिजाऊ संघटनेच्या अस्मिता शिंगोळो यांनी रिलायन्स फाऊंडेशन ने केलेल्या कामाबद्दल कौतुक केलं. यावेळी रिलायन्स फांऊंडेशन च्या नुपूर बहल यांनी अंगणवाडी केंद्राविषयी माहिती दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर डेप्युटी कमिशनर संगीता लोंढे, ठाणे जिल्हा परिषदेचे बालविकास विभागाचे संजय बागूल, संतोष भोसले, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये,सरपंच समिता संतोष सुरोशी,

,सहाय्यक बीडिओ आर के गवारी, बालविकास अधिकारी, अर्चना पवार,तसेच या विभागाच्या मुख्य सेविका, विस्तार अधिकारी, रायते शाळेचे एस एस पाटील, अंगणवाडी सेविका,ग्रामसेवक राजाभाऊ सुरवसे, आदी मंडळी उपस्थित होते. तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ, ग्रामपंचायत कर्मचारी, आदींनी परिश्रम घेतले.

## जाहिर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय, मुरबाड**

**प्रति,**
**१) श्री. संभाजी गोविंद बांगर,**
**राहणार भुवन, ता. मुरबाड, जि. ठाणे..... अर्जदार**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत भुवन,**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे.......सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

१. उपरोक्त अर्जदार यांचे भाऊ कै.निवृत्ती गोविंद बांगर यांचा मृत्यु दिनांक १६/०९/१९९९ रोजी राहत्या घरी मु.भुवन, ता.मुरबाड, जि.ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म / मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी जन्म/मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिल दार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. ८२८ दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या भावाचा जन्म / मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे /१२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**हुकमावरुन**
**सही/-**
**(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

**जा.क्र. फौजदारी/जन्म मृत्यु नोंद/कावि-५१४/२०२४**

## निवडणुका एप्रिलनंतरच...?

पान १ वरून ▶▶ निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने, याबाबतचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात झाल्यानंतर निवडणुकीची तयारी करण्यासाठी किमान तीन महिन्यांचा वेळ लागेल. त्यामुळे तूर्तास महानगरपालिकांसह नगरपालिका, नगर पंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुका होण्याची शक्यता नाही. सर्वोच्च न्यायालयात २२ जानेवारी रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी होणार आहे. न्यायालयाने निर्णय दिल्यानंतरच निवडणूक प्रक्रिया सुरू होईल.
- सुरेश काकाणी, सचिव, राज्य निवडणूक आयोग

**निवडणुका कधी?**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मतदार याद्या तयार करणे, प्रभाग रचना आणि ओबीसी आरक्षणाची अंमलबजावणी आदींचा विचार करता निवडणूक तयारीसाठी तीन महिने कमी पडतात. त्यानंतर मार्च, एप्रिलमधील शाळांच्या परीक्षा आणि उन्हाळा लक्षात घेता. निवडणुकांसाठी पावसाळा उजाडतो. त्यामुळे पावसाळ्यात निवडणुका घ्यायच्या की पावसाळ्यानंतर याचा निर्णय राज्य निवडणूक आयोग घेईल. पण, त्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन निवडणुका घेण्याचा मार्ग सुकर करण्याची गरज आहे.

**निवडणूक आयुक्तांची नियुक्ती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्तांची निवडही रखडल्यामुळे आयोगाचा कारभार आयुक्तांशिवाय सुरू आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य निवडणूक आयुक्तपदाच्या निवडीची प्रक्रिया सरकारने राबविली. माजी मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई पोर्ट ट्रस्टचे(बीपीटी) माजी अध्यक्ष राजीव जलोटा, नियोजन विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांच्यासह अनेक सनदी अधिकाऱ्यांनी अर्ज केले होते.आयुक्तांच्या नियुक्तीच्या हालचाली आता पुन्हा सुरू झाल्या असून त्यावर लवकरच निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

मविआच्या सत्तेत मुंबईसह इतर महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितींमधील सदस्य संख्या वाढवण्यात आली होती. महायुती सरकारने ती पूर्वीप्रमाणे केली. याबाबत सुनावणी प्रलंबित आहे. न्यायालयाने वाढीव सदस्य संख्येला मान्यता दिली तर प्रभाग रचना, जिपची गट रचना करण्यास वेळ लागेल. प्रभाग रचना करण्याचा अधिकार यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे होता, तो राज्य सरकारने कायद्यात बदल करून आपल्याकडे घेतला. तो अधिकार पुन्हा आयोगाला देण्याबाबत याचिका प्रलंबित आहेत.

✍ राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची एकूण सदस्य संख्या अडीच लाख आहे. त्यामध्ये २७,९०० ग्रामपंचायतींमधील सदस्यांचा समावेश आहे.

✍ राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या निवडणुका दोन ते चार वर्षांपासून रखडलेल्या आहेत. यामध्ये नवनिर्मित जालना व इचलकरंजी महापालिकेची अजून पहिलीच निवडणूक झालेली नसून सर्व ठिकाणी आयुक्तच प्रशासक म्हणून कारभार चालवत आहेत.

✍ राज्यात २४५ नगरपरिषदा आणि १४६ नगरपंचायतीच्या निवडणुका प्रलंबित आहेत. सरकारी चालढकलीमुळे ३४ पैकी २६ जिल्हा परिषदा, ३५१ पैकी २८९ पंचायत समित्यांध्ये प्रशासकीय राजवट सुरू आहे.

✍ फेब्रुवारी २०२५ अखेर आणखी सहा जिल्हा परिषदा आणि ४४ पंचायत समित्यांची मुदत संपत आहे. अशाच प्रकारे १५०० ग्रामपंचायतींमध्येही सध्या प्रशासकीय राजवट आहे.

## ठाणे मनपाचा तिसरा डोळा...

पान १ वरून ▶▶ आलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणी, झाडांच्या फांद्या पडणे, वारा, पाऊस यामुळे बंद होत असल्याचे यापुर्वी समोर आले होते. या कॅमेऱ्यांची पालिकेक़डून दुरुस्ती करून ते पुन्हा कार्यान्वित करण्यात येत होते. २०१६, २०१७ आणि २०१८ या तीन वर्षात हे कॅमेरे संपुर्ण शहरात बसविण्यात आले आहेत. त्यासाठी नगरसेवक निधीही वापरण्यात आला होता.

हे कॅमेरे बसवून सात ते आठ वर्षांचा काळ लोटला असून यातील अनेक कॅमेरे आता नादुरुस्त होऊ लागले आहेत. असे काही कॅमेरे पालिकेने यापुर्वी काढून त्याजागी नवीन कॅमेरे बसविले आहेत. परंतु गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटांचा सामना करणाऱ्या पालिकेची आर्थिक स्थिती अद्यापही रुळावर आलेली नसून नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नाही. त्यामुळे नादुरुस्त कॅमेरे काढून त्याजागी नवीन कॅमेरे लावण्यासाठी निधी उपलब्ध होत नसल्याची माहिती सुत्रांनी दिली. ठाणेकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संपुर्ण शहरभर बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ११२ सीसीटिव्ही कॅमेरे गेल्या काही महिन्यांपासून बंदावस्थेत आहेत.

ठाणे शहरात नादुरुस्त कॅमेरे काढून त्याजागी नवीन कॅमेरे लावण्यासाठी २५ ते ३० लाखांच्या निधी आवश्यकता आहे. पंरतु या कामासाठी पालिकेकडे निधीच उपलब्ध नाही. दरम्यान, ठाणे आयुक्तालय क्षेत्रातील ठाणे, भिवंडी, उल्हासनगर ते बदलापूर या शहरात सहा हजाराहून अधिक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रस्तावाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. कॅमेरे बसविण्याच्या कामाला सुरूवातही झाली आहे. त्यामुळे निधी अभावी बंदावस्थेत असलेल्या कॅमेऱ्यांच्या ठिकाणी पोलिस योजनेतील कॅमेरे बसविण्याचा पर्याय पालिकेने पुढे आणला असून त्यासाठी पालिकेकडून पोलिसांना तसे कळविण्यात येत आहे.

## मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त...

पान १ वरून ▶▶ व्हावी, या उद्देशाने शनिवारऐवजी रविवारी मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, तिन्ही पक्षातील बडे नेते आपल्या मंत्रिपदासाठी आग्रही आहेत. मात्र, यंदा भाजपकडून नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

महायुती सरकारच्या मंत्रिपदाच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब झालं असून लवकरच नवीन मंत्री शपथ घेणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, राष्ट्रवादीचे १०, शिवसेनेचे १२ आणि भाजपचे २१ मंत्री शपथ घेणार आहेत. त्यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपदाचा समावेश आहे. या मंत्रिपदाची संभाव्य नावे समोर आली आहेत. मात्र, ऐनवेळी या नावांवर शिक्कामोर्तब होऊन अधिकृतपणे ती जाहीर केली जाऊ शकतात. त्यामध्ये, काहीसे बदलही होण्याची शक्यता आहे. मात्र, नव्या मंत्र्यांचा शपथविधी आता नागपूरला होणार असल्याचे समजते.

आमदारांच्या सोईसाठी शपथविधी १५ तारखेला नागपुरात होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. १६ तारखेपासून विधीमंडळाचं अधिवेशन असल्यामुळे १५ तारखेला नागपुरात शपथविधी होऊ शकतो, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

त्यामुळे, मुंबईतील राजभवनऐवजी आता नागपुरातच तयारीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नागपुरात पहिल्यांदाच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो.

**राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून लॉबिंग**

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं देण्यात येणार असून त्यामध्ये ८ कॅबिनेट तर २ राज्यमंत्रिपदं असणार आहेत. त्यासाठी आता नेत्यांनी लॉबिंग सुरू केल्याचं चित्र आहेत. माजी मंत्री हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील यांनी अजित पवारांची देवगिरी निवासस्थानी भेट घेतली. तर त्याआधी माजी मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांनीही अजित पवारांची भेट घेतली होती. त्याचवेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे देखील उपस्थित असल्याची माहिती आहे.

## मला पदमुक्त करा ! ...

पान १ वरून ▶▶ रोजी जाहीर झाला. त्यामध्ये, काँग्रेस महाविकास आघाडीचं पानीपत झाल्याचं पाहायला मिळालं. या निकालानंतरच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदावरुन नाना पटोले पायउतार होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, नाना पटोले यांनी राजीनाम्याचा कुठलाही निर्णय घेतला नसल्याचे त्यांच्या कार्यालयातून स्पष्ट करण्यात आलं होतं. त्यानंतर, आता पुन्हा एकदा पटोले यांच्या राजीनाम्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच, नाना पटोले यांनी स्वतःच राष्ट्रीय अध्यक्षांना पत्र लिहून प्रदेशाध्यक्ष पदातून पदमुक्त करण्याची विनंती केल्याची माहिती आहे. त्यामुळे, आता काँग्रेसचे वरिष्ठ नेते काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, काँग्रेसमध्येही नाना पटोले यांना काही बड्या नेत्यांचा अंतर्गत विरोध असल्याची माहिती आहे.

**ईव्हीएमविरुद्ध आंदोलनाला दिला जोर**

दरम्यान, निवडणूक निकालानंतर आता काँग्रेससह महाविकास आघाडीचे नेते ईव्हीएमविरोधात आंदोलन करत आहेत. त्यासाठी, नाना पटोले यांनी स्वतः माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावाला भेट देऊन ईव्हीएमविरोधी आंदोलनाला जोर देण्याचं काम केलं. यावेळी, बॅलोट पेपरवर मतदान घेत असल्यास मी राजीनामा द्यायला तयार असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं.

## जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने 'कुष्ठमुक्त महाराष्ट्र'...

पान १ वरून ▶▶ ठाणे जिल्ह्यात आश्रमशाळा -४३, वसतिगृह - २८, बांधकामाच्या जागा - ५९३, विटभट्टी - ७३७, कारागृह - ३, अति जोखमीची ठिकाणे - १ हजार ९७६ येथील कामगार यांचे आशा व स्वयंसेवका मार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्वरित कुष्ठरोगाचे निदान करून नजदिकच्या शासकीय संस्थेत / आरोग्य केंद्रात त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येणार आहेत. या मोहिमेचे मूळ उद्दीष्ट वंचित विभागातील कुष्ठ रुग्णांना शोधून संसर्गाची साखळी खंडित करणे आहे.

कुसुम मोहीम प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी जिल्ह्यातील सर्व यंत्रणेला निर्देशित केले आहे. तसेच आरोग्य कर्मचारी, आशा व स्वयंसेवक यांना प्रशिक्षण देण्यात आले असून जिल्ह्यातील मनुष्य बळाची माहिती घेवून त्यानुसार सुक्ष्म कृती आराखडा बनवून त्या प्रमाणे कुष्ठरोग शोध मोहिमेचे नियोजन करण्यात आलेले आहे. निवडलेल्या जोखीम ग्रस्त भागातील लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार असून मोहिमेचे सर्व स्तरावर प्रभावी संनियंत्रण व पर्यवेक्षण करण्यात येणार आहे.

**कुष्ठरोगाची लक्षणे :-**

- कुष्ठरोग जिवाणूमुळे होणारा सांसर्गिक आजार आहे.

- अंगावर असणारा फिक्कट, लालसर रंगाचा बधिर चट्टा व हाता पायामध्ये अशक्तपणा येणे ही कुष्ठ रोगाची प्रमुख लक्षणे आहेत.

- कानाच्या पळया जाड होणे व चेहरा लालसर, तेलकट व जाड होणे.

- त्वचेशी संलग्न मज्जा जाड व दुखऱ्या होणे.

- कुष्ठरोग सर्व वयोगटातील व्यक्तींना होऊ शकतो.

**कुष्ठरोगामुळे येणारी विकृती**

Grade I विकृती : यामध्ये तळहाताला किंवा तळपायाला बधिरता येते. संवेदना नसल्याने गरम वस्तु पकडल्याने किंवा काही टोचल्याने तळ हाताला किंवा तळ पायाला जखमा पडू शकतात ज्या वर्षानुवर्षे जखम पुर्ण बरी होत नाही.

Grade II विकृती : या प्रकारची विकृती डोळयांनी दिसण्यासारखी असते, जसे की हात पायाची बोटे वाकडी होणे, मनगट लुळे पडणे, पाय लुळा पडणे, तळहाताला तळपायाला जखमा पडणे, डोळयांच्या पापण्या पूर्णतः बंद न करता येणे अशा प्रकारच्या विकृती ग्रेड टु च्या कुष्ठरोगमध्ये येते. या बाबत रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हा समन्वय समितीच्या वतीने सर्व अतिजोखमीच्या भागात राहणाऱ्या समाज घटकातील कुष्ठरोगाची तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ. गीता काकडे यांनी केले आहे.

## पुढील स्थानक 'चिखलोली'...

पान १ वरून ▶▶ स्थानक सुरू होण्यास मदत मिळणार आहे.

चिखलोली रेल्वे स्थानकाच्या मंजुरीसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह अनेकांनी पाठपुरावा केला होता. त्यामुळे या स्थानकाला मंजुरी मिळाली. चार वर्षांपूर्वी तिकीट दर निश्चित करण्याचे पत्र रेल्वेने मंजूर केले. २०२२ मध्ये यासाठी आवश्यक जागेचे भूसंपादन पूर्ण करण्यात आले. २०२३ आणि २०२४ या वर्षात विविध टप्प्यातील कामांसाठी विविध निविदा जाहीर करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता उर्वरीत कामांसाठी निविदा जाहीर करण्यात आली आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी